आशियाना



तलत महमूदच्या मधाळ आवाजातून झिरपलेले गीतकार राजेंद्र कृष्णचे हे शब्द प्रेमिकांच्या वेड्याखुळ्या प्रेमाचं किती सार्थ वर्णन करतात बघा ! आपल्या प्रेमात हे वेडे जीव एवढे आकंठ बुडालेले असतात की त्यांना या जगाची पर्वाच नसते. तो आणि ती. बस्स ! दोघांचंच विश्व ! एकमेकांवरच्या उत्कट प्रेमाची अशीच जीवघेणी कथा 'आशियाना' चित्रपटात गुंफण्यात आली होती. संगीतकार मदन मोहननी दिलेल्या एकाहून एक सरस गाण्यांच्या पार्श्वभूमीवर राज कपूर आणि नर्गीसने साकारलेले ते दोन प्रेमी जीव. पण कुठं बिनसलं कुणास ठाऊक आणि 'आशियाना' सुपरफ्लॉप ठरला. आज त्याची आठवण शिल्लक उरलीय ती फक्त त्यातल्या — श्रवणीय गाण्यांमुळे. बाकी तो कुणालाच आठवत नाही.

कुलूसारख्या निसर्गरम्य परिसरातील एक छोटंसं खेडेगाव. आई-वडिलांचं छत्र हरपलेला दहा-बारा वर्षांचा छोटासा राज (मास्टर रतनकुमार) आपल्या मावशीच्या शोधार्थ या गावात येतो खरा, पण इथं येताच त्याचा भ्रमनिरास होतो. त्याची वृद्ध मावशी कधीच हे जग सोडून गेलेली असते. आता पुन्हा कुठं जायचं या विचारात पडलेल्या राजला मग त्याच गावातला एक उमद्या मनाचा तरुण इंदर (रणधीर) आसरा देतो. या धडपड्या इंदरचा टॉफीज बनविण्याचा छोटासा उद्योग असतो. तयार केलेल्या टॉफी तो गावात विकायचा आणि त्यावर आपला उदरनिर्वाह चालवायचा. छोट्या राजला तो आपल्या या कामात मदतनीस म्हणून ठेवून घेतो.

या इंदरकडे टॉफी विकत घ्यायला एक सुंदर गोजिरवाणी मुलगी नेहमी यायची. गावचा मुखिया (शिवराज) तिचा बाप आणि त्याची ही गौरन. टॉफीच्या निमित्ताने इंदरकडे येणे-जाणे करताना तिची भेट राजशी होते. दोघंही समवयस्क. त्यामुळे त्यांची गट्टी जमायला कितीसा वेळ लागणार ? दोघंही एकमेकांशी तासन्‌तास गप्पा मारू लागतात. एकत्र बागडू लागतात. वर्षामागून वर्षे जाऊन गौरन (नर्गीस) वयात येते. राजही (राज कपूर) तरणाबांड देखणा युवक बनतो. इतक्या वर्षांच्या दीर्घ मैत्रीचं रूपांतर आता दृढ प्रेमात झालेलं असतं. आपल्या प्रेमाचं प्रतीक म्हणून राजने तिला स्वत: तयार केलेला एक छोटासा बाहुला भेट म्हणून दिलेला असतो आणि गौरननेही तो मोठ्या प्रेमाने आपल्या जवळ ठेवून स्वत:च्या उत्कट प्रेमाची जणू कबुलीच दिलेली असते.

दरम्यान, इंदरच्याही धंद्याची भरभराट होऊन तो चांगला स्थिरस्थावर होतो. लग्न करून आयुष्याच्या मार्गी लागतो. राज आणि गौरनची जवळीक तो त्यांच्या लहानपणापासूनच बघत आला असल्यामुळे या दोघांचंही लग्न व्हावं असं त्याला वाटणं स्वाभाविकच. शिवाय राजचा पालनकर्ता तोच असल्यामुळे या गोष्टीत पुढाकार घेऊन तो गौरनच्या वडिलांना भेटतो आणि दोघंही एकमेकांना अनुरूप असल्यामुळे त्यांचं लग्न करून टाका, असा सल्ला देतो.

राज आणि गौरनची ही जवळीक त्याच गावात टवाळी करीत फिरणाऱ्या एका तरुणाला (इफ्तिकार) खटकत असते. कारण त्याचाही गौरनवर डोळा असतो आणि येता-जाता तिची छेड काढण्याची एकही संधी तो सोडत नसतो. तिने आपल्याशी लग्न करावं, हीच त्याची अपेक्षा. अर्थात गौरनला त्याच्या या गोष्टीत जराही रस नसतो. राज आणि गौरन गावाबाहेरच्या एकांत स्थळी नेहमी भेटत व प्रेमाच्या आणाभाका घेत. एक दिवस गौरन अशीच राजची वाट पाहत त्या संकेत स्थळी थांबलेली असताना कसा कुणास ठाऊक पण तो टवाळ तरुण तिथं आगंतुकासारखा टपकतो आणि आपल्या नेहमीच्या पद्धतीने तिची मनधरणी करायला सुरुवात करतो. गौरनला ते आवडत नाही. तेवढ्यात राजही तिथं पोहोचतो. त्या तरुणाला पाहून राज चिडतो. दोघांची बाचाबाची होऊन प्रकरण हातघाईवर येतं. हाणामारी करीत दोघंही तिथल्या एका तुटक्या कड्यापर्यंत येऊन पोहोचतात आणि काय होतंय ते कळायच्या आत त्या टवाळखोराचा पाय घसरतो नि तो

मैं पागल मेरा मनवा पागल



बॅनर : सब्बरवाल्स, बम्बई
निर्माता : बी. स्विन्दर सिंग सब्बरवाल
गीतकार : राजेंद्र कृष्ण
दिग्दर्शक : बी. त्रिलोचन
संगीतकार : मदन मोहन
प्रदर्शन : शुक्रवार, २४ ऑक्टो. १९५२
कलाकार : नर्गिस, राज कपूर, रणधीर, मोहना, रूपमाला, शिवराज, इफ्तिखार, सुरिन्दर ज्युनिअर, मा. रतन, बेबी साधना
गीते :
१) तुम चाँद के साथ चले आओ, ये रात सुहानी हो जाये... (लता)
२) ओ मैडम, दो से हो गये एक हम, न फाका न गम... (शमशाद / किशोर)
३) मुख मोड न लेना साजना, दिल रो रो के बेचैन होगा... (लता)
४) मेरे पिया से कोई जाके कह दे, जीवन का सहारा तेरी याद है... (लता)
५) मेरा करार ले जा, मुझे बेकरार कर जा... (तलत महमूद)
६) समां है बहार का, ले ले मजा प्यार का, आजा आजा साँवरे... (लता)
७) मेरा करार ले जा, मुझे बेकरार कर जा... (लता)
८) मैं न जानूं मेरे दिल को ये क्या हो गया... (लता)
९) मैं पागल मेरा मनवा पागल, पागल मेरी प्रीत रे... (तलत महमूद)

कड्यावरून कोसळून खोल दरीत पडतो.

खरं तर झाला प्रकार अपघातच असतो, पण पोलीस चौकशीत राजवर मनुष्यवधाचा आरोप सिद्ध होतो आणि तीन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा त्याला फर्मावली जाते. गौरनवर हा मोठा आघात असतो. तुरुंगात जाण्याआधी गौरन त्याला भेटायला येते तेव्हा तिला धीर देत राज सांगतो - 'फक्त तीन वर्षे माझी वाट पाहा. मी लवकरच परत येईन आणि मग आपण कायमचे एकत्र होऊ.' त्यावर गौरनही त्याला गहिवरल्या स्वरात उत्तरते - 'राज, तीन वर्षेच काय, तीन जन्म तुझी वाट पाहण्याची माझी तयारी आहे.' आणि पोलीस राजला घेऊन जातात.

इकडे गौरन आता एकाकी पडते. राजच्या विरहात दिवस ढकलू लागते, पण त्याच्या आठवणीत आपल्या लेकीने असं गुंतून पडणं गौरनच्या वडिलांना आवडत नाही. शिवाय राजवर आरोप सिद्ध झाल्यामुळे तिचं एका गुन्हेगारासोबत लग्न होणं त्यांना मान्य नसतं. म्हणून ते तिच्यासाठी इतरत्र स्थळं शोधू लागतात, पण गौरनला राजशिवाय इतर कुणातच रस नसतो. तरीही तिचे वडील तिच्या लग्नाची जुळवाजुळव करू लागतात. गौरन सैरभैर होते. आपल्या खोलीत स्वत:ला बंदिस्त करून घेते. तिच्या घराला लागूनच दुथडी भरून नदी वाहत असते. बाप जेव्हा निर्वाणीचं विचारायला तिच्या खोलीत येतो तेव्हा विमनस्क अवस्थेत ती खिडकीजवळ उभी असते. तो काही बोलणार तोच गौरन त्या खिडकीतून खाली नदीत स्वत:ला झोकून देते. तिचा शोध घेण्याचे सारे प्रयत्न निष्फळ ठरतात. गौरन या जगातून कायमची गेलेली असते.

इकडे तुरुंगातील चांगल्या वर्तणुकीमुळे राजची तीन वर्षे पूर्ण होण्याआधीच मुक्तता होते आणि तो आपल्या गौरनला भेटायला गावात येतो. पण त्याला तिथं तिच्या निधनाचीच बातमी कळते. राजचा त्यावर विश्वास बसत नाही. तो वेड्यासारखा तिचा शोध घेऊ लागतो. त्यांच्या संकेतस्थळी तिची वाट पाहू लागतो, पण ती येत नाही. त्याचदरम्यान, राजला अचानक वाटेत त्याने गौरनला प्रेमाचं प्रतीक म्हणून दिलेला तो छोटासा बाहुला सापडतो. आज हा बाहुला सापडला तेव्हा गौरनही कधीतरी सापडेल, याबाबत त्याचा विश्वास अधिकच दृढ होतो.

...आणि राजची प्रतीक्षा फळास येते. साक्षात गौरन त्याच्या पुढ्यात येऊन उभी राहते. तिला पाहून त्याचा आनंद गगनात मावेनासा होतो. तिच्याशी किती बोलू असं त्याला होऊन जातं, पण ही गौरन फक्त त्यालाच दिसत असते. इतरांच्या दृष्टीने ती अदृश्यच असते. म्हणून राज जेव्हा ही आनंदाची वार्ता इंदरला सांगायला जातो तेव्हा त्याचा विश्वास तर बसत नाहीच, पण हा केवळ भास आहे, असंच तो राजला सांगतो. त्याचं मन दुसरीकडे गुंतविण्याचा प्रयत्न करू लागतो, पण राजला गौरनशिवाय दुसरं काही सुचतच नाही. अखेर इंदर त्याच्याकडून वचन घेतो, 'जर गौरन तुला पुन्हा भेटली तर ठीक. अन्यथा तू मी सांगेन त्या दुसऱ्या मुलीशी लग्न करायला हवंस !'

गौरन त्याला पुन्हा भेटायला येणार असते म्हणून राज त्या संकेतस्थळी जाऊन डोळ्यात प्राण आणून तिची वाट पाहत थांबतो. पण ती येत नाही. त्याला तिचा खूप राग येतो. दुसऱ्या दिवशी पुन्हा तो तिला भेटायला जातो तेव्हा ती त्याला भेटते. 'काल कुठं होतीस ?' या राजच्या प्रश्नाला ती उत्तरते - 'काल नदीला पूर आला होता. त्यामुळे मला येता आलं नाही. आज ती गोठली आहे. म्हणून मी येऊ शकले.'

राजला त्याची प्रियतमा भेटते. तो नेहमी इंदरला सांगायचा - 'आकाशात जेव्हा चंद्र दिसत नसतो याचा अर्थ तो कायमचा अदृश्य झालेला नसतो. पुन्हा केव्हा तरी दिसणारच असतो.' तशीच त्याची ही गौरन. तिच्याबद्दलचा त्याचा विश्वास खरा ठरतो. त्याचं प्रेम सार्थकी लागतं. कारण या खेपेस ती त्याला आपल्यासोबतच न्यायला आलेली असते. दूर. आपल्या विश्वात. जिथे त्या दोघांना कोणीही विभक्त करू शकणार नसतं !

'अ हॉन्टीगली ब्युटिफूल लव्ह स्टोरी' अशी जाहिरात केलेल्या 'आशियाना' चित्रपटाची ही कथा त्याच्या बाळबोध आणि रटाळ हाताळणीमुळे पडद्यावर कंटाळवाणी ठरली होती. पूर्वार्धात कुलू-मनालीचं निसर्गरम्य सौंदर्य जरी बघायला छान वाटलं तरी उत्तरार्धात रणधीर आणि मोहना यांचे विनोदी प्रसंग मूळ कथेला बाधकच ठरतात. नर्गिसचे अदृश्य रूपातील राजला भेटण्याचे प्रसंग मात्र भावपूर्ण आणि सरस उतरले होते, पण 'आशियाना'त खरी बाजी मारली ती संगीतकार मदन मोहननी. यातली लताची एकाहून एक मिठ्ठास गाणी ऐकल्यावर मदन मोहनची लता ही काय चीज आहे याचा प्रत्यय येतो. खरं तर राज कपूर म्हटला की त्याला मुकेशचा प्ले-बॅक असा समज त्यावेळी सिद्ध झालेला असूनही मदन मोहननी कथेची हळुवार जातकुळी पाहून मुद्दामच त्याला तलतचा आवाज दिला होता. मात्र या उत्कट प्रेमकथेत दोघा प्रेमींचं एकत्र असं एकही द्वंद्वगीत त्याने का टाकलं नाही कुणास ठाऊक ! अर्थात एका गोष्टीची रुखरुख वाटतेच. बाकी सगळं जाऊ द्या ! पण नुसत्या गाण्यांच्या पुण्याईवर तरी 'आशियाना'ला रसिक प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद द्यायला हवा होता ! पण हाय रे किस्मत !

■ विजय शिंगोर्णीकर